| | |
|---|---|
| MHKO100001062023 | दाखल तारीख – ०३/०२/२०२३<br>नोंदणी तारीख – ०३/०२/२०२३<br>निकाल तारीख – ०५/०५/२०२६<br>कालावधी – वर्षे – महिने – दिवस<br>०३ ०३ ०२ |

**दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,गडहिंग्लज**
**यांचे न्यायालयात**
**पिठासीन अधिकारी डी. एम. पवार**

**नियमित दिवाणी दावा क्र. ४१/२०२३**
**निशाणी क्रमांक – ५५/अ.**

१) श्री.धोंडीबा परसू घुगरे , )
वय ७५ वर्षे, धंदा शेती, )
रा. महागांव , तालुका गडहिंग्लज, )
जिल्हा कोल्हापूर. ) **वादी**

**विरुध्द**

१) श्री. नाना परसू घुगरे , )
वय ६१ वर्षे, धंदा शेती , )
रा. महागांव , ता. तालुका गडहिंग्लज, )
जिल्हा कोल्हापूर. )

२) श्री. शंकर परसू घुगरे , )
वय ७० वर्षे, धंदा शेती , )
रा. सदर , )

३) अनुसया ज्ञानदेव पन्हाळकर , )
वय ७२ वर्षे, धंदा गृहिणी , )
रा. कापशी (से.), ता. कागल , )
जिल्हा कोल्हापूर. )

४) विमल दशरथ गिलबिले , )
वय ६५ वर्षे, धंदा गृहिणी , )

| | | | |
|---|---|---|---|
| | रा.लाकुडवाडी, ता. आजरा, | ) | |
| | जिल्हा कोल्हापूर. | ) | |
| ५) | कमल आनंदा बोलके , | ) | |
| | वय ५५ वर्षे, धंदा गृहिणी , | ) | |
| | रा.बोलकेवाडी, ता. आजरा, | ) | |
| | जिल्हा कोल्हापूर. | ) | |
| ६) | नंदा गुंडू मुंगूर्डेकर , | ) | |
| | वय ५० वर्षे, धंदा ... , | ) | |
| | रा.कांडगांव , ता. आजरा, | ) | |
| | जिल्हा कोल्हापूर. | ) | **प्रतिवादी** |

**दावा वाटप व कायम मनाई ताकिदीकरीता**

---

**<u>विधीज्ञ</u>**

वादीतर्फे विधीज्ञ – श्री. एस. व्ही. पोवार, श्री. आर. आर. चव्हाण.
प्रतिवादी क्र.१ – श्री. एम. व्ही. पाटील.
प्रतिवादी क्र.२, ३ व ५ विरुध्द दावा विना कैफियत.
प्रतिवादी क्र.४ व ६ – कु. एल. एम. सुतार.

---

## <u>न्या य नि र्ण य</u>

(**दिनांक– ०५/०५/२०२६ रोजी अधिघोषीत** )

वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरिता व कायम मनाईकरीता दाखल केला आहे.

वादी यांची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे :–

**२. अ)** मौजे महागांव, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथील सि.स.नं.१३१० क्षेत्र १२६ चौ.मी. व त्यामधील ग्रा.पं.मि.नं.७१६ ची घर मिळकत

यासी चतुसिमा: पुढीलप्रमाणे –

पुर्वेस – श्री.मारूती नाना घुगरे यांची मिळकत,

पश्चिमेस –श्री.भाग्येश विठ्ठल घुगरे यांची मिळकत,

दक्षिणेस – रस्ता,

उत्तरेस – रस्ता.

**ब)** मौजे महागांव, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथील गट नं.८९१ क्षेत्र २ हे.२९ आर,पो.ख. ०–१४,आकार १रू.१९ पैसे यापैकी ० हे.५७.२५ आर,आकार ०–२९ पैसे.

**क)** मौजे उंबरवाडी, ता.गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथील गट नं.२२३ क्षेत्र ० हे.४६ आर,आकार ० रू.२५ पैसे संपूर्ण क्षेत्र या मिळकती दाव्याचा वाद विषय असून सदर मिळकतींना यापुढे सोईकरीता "दावा मिळकती" असे संबोधण्यात येत आहे.

**३.** वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत १अ ही वादी व प्रतिवादी यांचे वडील परसू नाना घुगरे यांचे नावे नोंद होती. सदरहू मिळकतीमध्ये दगड,विटा,मातीचे कौलारू घर असून सदरची मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत होय. तसेच दावा अर्जी कलम १ब व १क या मिळकती देखील वादी व प्रतिवादी यांचे वडील परसू नाना घुगरे यांचे नांवे नोंद होत्या. वादी व प्रतिवादी यांचे वडील दि. २९/०७/२००५ रोजी मयत झालेले आहेत. मयत परसू घुगरे यांना वादी व प्रतिवादी नं.१ व २ ही मुले व प्रतिवादी नं.३ ते ६ या मुली असे सरळ व कायदेशिर वारस आहेत. श्री.परसू नाना घुगरे यांचे मृत्युनंतर दावा मिळकतीचे कागदोपत्री यातील वादी, प्रतिवादी नं.१ व २ तसेच विवाहीत प्रतिवादी नं.३ ते ६ यांची नावे नोंद झालेली आहेत.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी हे आपले वडील परसू नाना घुगरे यांचे समवेत एकत्र कुटूंबामध्ये राहत होते व परसू नाना घुगरे याचे हयातीमध्ये वादी, प्रतिवादी व वडील परसू नाना घुगरे यांचे दरम्यान दावा मिळकतीबाबत सदरनिरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही व त्याचे मृत्यूनंतर देखील दावा मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सरसनिरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंबाची मिळकत असून सदरहू मिळकत ही वादी व प्रतिवादी हे समाईकांमध्ये उपभोगत असतात. सदरहू मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाटप झालेले नाही. असे असताना यातील प्रतिवादी नं.१ हा दांडगट वृत्तीचा इसम असून तो एकत्र कुटूंबाच्या मिळकतीबाबत वाद करून वादी यांना धमकावत असतो. त्याचाच एक भाग म्हणून यातील प्रतिवादी नं.१ यांनी एकत्र कुटूंबाच्या दावा अर्जी कलम १अ मिळकतीबाबत दिनांक ०१/११/२०२२ रोजी कोणतेही कारण नसताना वाद करून यातील वादी यांना काठीने पाठीत व हातावर मारहाण करून जिवे मारणेचे धमकी दिली व त्याबाबत वादी यांनी प्रतिवादी नं.१ विरूध्द गडहिंग्लज पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली असून प्रतिवादी नं.१ विरूध्द गु.र.नं.३२०/२०२२ ने गुन्हा नोंद आहे.

६. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची एकत्र कुटूंबाची असताना देखील प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.२ च्या चेतावणीवरून दिनांक २८/१२/२०२२ रोजी दावा अर्जी कलम १अ मिळकतीमध्ये येवून जे.सी.बी. चे सहाय्याने दादागिरीने बांधकाम पाडणेस सुरू केले त्याबाबत वादी यांनी तसे न करणेबद्दल समजावून सांगितले असता प्रतिवादी नं.१ व २ यांनी वादी यांचे अंगावर धावून येवून त्यांना ठार मारण्याची धमकी दिली व दावा मिळकतीमधील जुने घर बेकायदा जे.सी.बी. च्या सहायाने पाडून टाकले. तसेच प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२ शी संगनमत करून दावा मिळकतीमध्ये

नवीन घर बांधणेसाठी साहित्याची जुळवा जुळव करून दावा मिळकतीमध्ये घर बांधणेचा घाट घातला आहे व वादी यांचे दावा मिळकतीमधील समाईकांतील कब्जे वहिवाटीला हरकत व अडथळा करून त्यांना दावा मिळकतीमधून हुसकावून लावणेचा प्रयत्न चालविला आहे.

७. सबब प्रतिवादी यांनी दावा अर्जी कलम १अ या मिळकतीमध्ये कोणतेही पध्दतीचे बांधकाम करू नये व दावा मिळकतीमधील वादी यांचे समाईकांतील कब्जे वहिवाटीला हरकत व अडथळा करून वादी यांना दावा मिळकतीमधून हुसकावून लावू नये अशी कायम मनाई ताकिद होणेकरीता मे.न्यायालयात रे.क.नं.९/२०२३ चा दावा दाखल केला व त्या कामी यातील प्रतिवादी नं.१ यांचे विरूध्द तुर्तातुर्त मनाईचा आदेश मिळणेकरिता नि.५ ला अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये प्रतिवादी नं.१ ने वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाटप झालेचे कथन करून वादीचा दावा नाकारलेला आहे. तसेच रे.क.नं.९/२०२३ चा वाटपाकरिता आणलेखेरील तुर्तातुर्त मनाईचा अर्ज चालणेस पात्र नाही असा बचाव घेतलेला आहे व त्या कामी पुढील लांबची तारीख दिलेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी नं.१ ने दावा मिळकत १अ मध्ये घाईगडबडीने बांधकाम सुरू केलेले आहे. रे.क.क्र.९/२०२३ चा दावा यातील वादी यांनी तांत्रिक कारणामुळे न्यायालयाच्या परवानगीने नवीन दावा दाखल करण्याच्या अटीवर काढून घेतला आहे.

८. दावा मिळकती या एकत्र कुटूंबाच्या आहेत व त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही. जरी यातील प्रतिवादी नं.३ व ४ यांनी प्रतिवादी नं.१ यांचे हक्कामध्ये दावा मिळकत १अ बाबत कोणताही व्यवहार केला असलेस तो व्यवहार चुकीचा व बेकायदेशीर असून तो रद्दबातल आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सरसनिरसमानाने वाटप झाले नसताना प्रतिवादी नं.१ हा आपल्या स्वत्:च्या मर्जीने दिशा ठरवून दावा अर्जी कलम १ मध्ये बांधकाम करणेचा प्रयत्न करत

आहे. सबब वादी यांनी दावा मिळकतीमधील प्राप्त होणारा १/७ अगर कायदयाप्रमाणे येणारा हक्क व हिस्सा तुटक होवून मिळणेकरिता व प्रतिवादी नं.१ यांनी दावा अर्जी कलम १अ मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये व दावा मिळकतीमध्ये असलेल्या शांततामय कब्जे वहिवाटीला हरकत करून दावा मिळकतीमधून वादी यांना हुसकावून लावू नये अशी कायम मनाई ताकिद होणेकरिता प्रस्तुचा दावा दाखल केला आहे. सबब तो मंजूर करण्यात यावा.

९. प्रतिवादी क्र.१ यांनी दाव्यास लेखी कैफीयत निशाणी क्र.११ वर दाखल करून दाव्यातील संपुर्ण मजकूर नाकारला आहे. त्यांचे असे कथन आहे की,दावा मिळकतीमध्ये बांधकाम किती व खुली जागा किती याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. दावा मिळकतीची आकारणी चुकीची केलेली आहे. बाजारभावाने सदर मिळकतीची किंमत १०,००,००० /– पेक्षा जास्त आहे. वादी व प्रतिवादी यांचे वडील परसू नाना घुगरे यांच्या मालकीच्या दावा मिळकती होत्या. बोली भाषेत गट क्र. ८९१ ला शेडू झऱ्याकडील शेत व गट क्र.२२३ ला तिर्थाकडील शेत असे म्हणतात. त्यांचे पुढे असे कथन आहे की, परसू नाना घुगरे यांनी त्यांच्या मालकीच्या जंगम व स्थावर मालमत्तेची तोंडी वाटणी त्यांच्या हयातीमध्ये पंचासमक्ष दि.२६/०५/१९९५ रोजी केली असून त्या झाले वाटपाप्रमाणे तिर्थाकडील शेत वादी यांना देण्यात आले. सि.स.नं.१३१० या मिळकतीमध्ये उत्तर बाजूर परसू व दक्षिण बाजूस जूने घर होते. त्या उत्तर बाजूच्या परसू मध्ये प्रतिवादी नं.१ ने घर बांधले असल्याने त्या बाजूची म्हणजेच उत्तर बाजूची सि.स.नं.१३१० पैकी निम्मा हिस्सा प्रतिवादी नं.१ यांना देण्यात आला व दक्षिणेचा निम्मा हिस्सा वादी यांना देण्यात आला. या घर मिळकतीमधील प्रतिवादी क्र. २ यांचा हिस्सा वादी व प्रतिवादी क्र.१ यांना रक्कम रू.२५,०००/– घेवून सोडून दिला होता. तसे झाले वाटपाचे कागद परसू नाना घुगरे यांची पंचासमक्ष वाटणीपत्र लिहून ठेवले असून त्यास वादी, प्रतिवादी नं.१ व २ यांनी मान्यता दिली आहे. सदर वाटपाप्रमाणे दावा मिळकत सि.स.नं.१३१० पैकी उत्तरेकडील निम्मा हिस्सा प्रतिवादी नं.१ यांच्या मालकी वहिवाटीची मिळकत

आहे. याप्रमाणे वडिलांच्या हयातीमध्येच वडिलांनी वाटप करून दिले आहे. तेव्हापासून प्रत्येकाच्या वेगवेगळया वहिवाटी आहेत.

**१०.** त्यांचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचे वडील परसू नाना घुगरे यांनी आपल्या हयातीमध्ये १९९५ साली वादी , प्रतिवादी नं.१ व २ यांना वाटप करून दिले असून तेव्हापासून दावा मिळकती मधील उत्तरेकडील निम्मा हिस्सा व त्यामधील राहते घर प्रतिवादी क्र.१ यांच्या कब्जेवहिवाटीस आहे. त्या मिळकतीस वादी व प्रतिवादीचा कोणताही संबंध नाही. मात्र वादी व प्रतिवादी यांचे वडील परसू नाना घुगरे यांच्या मृत्युनंतर मालमत्ता पत्रकास १९९५ च्या वाटपाप्रमाणे अंमल न झालेने वादी व प्रतिवादी यांची नावे वारस म्हणून २०२१ साली दाखल करून घेवून प्रतिवादी नं.१ यांच्या नावे निम्या हिस्याचे क्षेत्र लागणेसाठी म्हणून प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.२,३ व ५ यांच्या नावे दाखल असलेले सदर दावा मिळकत १अ पैकीचे क्षेत्र ५४.०० चौ.मी.रक्कम रू ४,५५,०००/- च्या मोबदल्यात खरेदी घेतली असून सदर खरेदी पत्राप्रमाणे प्रतिवादी नं.१ यांचे नाव मालमत्ता पत्रकास मालक म्हणून दाखल झाले आहे. त्यामुळे प्रतिवादी हे दावा मिळकतीमधील उत्तरेकडील निम्म्या क्षेत्राचे मालक आहेत.

**११.** त्यांचे पुढे असे कथन आहे की, ते त्यांच्या मालकीच्या सि.स.नं.१३१० मधील उत्तरेकडील निम्म्या हिस्यामधील त्यांचे राहत घर जिर्ण झाल्याने व पडण्याच्या स्थितीमध्ये आल्याने त्या मिळकतीमधील जुने घर काढुन सि.स.नं.१३१० मधील उत्तरेकडील प्रतिवादी नं.१ यांच्या मालकीच्या निम्म्या हिस्यामध्ये नवीन घराचे बांधकाम राहणेसाठी करीत आहे. वादी यांनी या सर्व बाबी लपवून ठेवून दाव्यात खोटी कथने करून प्रस्तुतचा खोटा मनाईचा दावा प्रतिवादी नं.१ यांचे विरूध्द दाखल केला आहे.

**१२.** त्यांचे पुढे असे कथन आहे की, वादी यांनी रे.क.नं.९/२०२३ चा काढुन घेवून प्रस्तुतचा दावा दाखल केला असल्याने प्रस्तुतचा दावा हा कायदयाने चालणेस पात्र नाही.

**१३.** प्रतिवादी क्र.४ व ६ यांनी दाव्यास लेखी कैफीयत निशाणी क्र.३५ वर दाखल करून दाव्यातील मजकूर मान्य केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, दावा मिळकती एकत्र कुटुंबाच्या असून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान कधीही सरस–निरस मानाने वाटप झाले नाही. प्रतिवादी क्र.४ व ६ यांचा प्रत्येकी १/७ हिस्सा जाहीर करून सरस–निरस मानाने वाटप होवून मिळावे. सदर वादी यांचा दावा खर्चासह मंजूर करण्यात यावा.

**१४.** वादी व प्रतिवादी यांचे वाद कथनावरुन निशाणी क्र.२५ येथे मुद्दे काढले आहेत. त्याचे कारणमीमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे–

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१** | वादी हे दावा मिळकतीमध्ये वाटप व तुटक कब्जा मागणेस पात्र आहेत का ? असलेस वादी व प्रतिवादी यांचा हिस्सा किती ? | नाही. |
| **२** | प्रतिवादी क्र.१ हे सिध्द करतात का की, दावा मिळकतीचे वाटप दिनांक २६/०५/१९९५ रोजी झाले आहे? | होय. |
| **३** | प्रतिवादी क्र.१ हे सिद्ध करतात का की, दावा मिळकत १अ मधील प्रतिवादी क्र.२,३ व ५ यांच्या हिश्याचे क्षेत्र त्यांनी खरेदीपत्राने खरेदी केले आहे? | अंशत होय. |
| **४** | वादी हे सिद्ध करतात का की, प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीमध्ये असलेल्या त्यांच्या शांततामय वहिवाटीस हरकत अडथळा केला ? | नाही. |
| **५** | वादी मागणीप्रमाणे प्रतिवादीविरूध्द कायम मनाई ताकिद मिळणेस पात्र आहे का? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६ | आदेश व हुकूमनामा काय ? | दावा खर्चासह नामंजूर करण्यात येतो. |

## का र ण मी मां सा

**१५.** वादी यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी २७ वर दाखल केले आहे. वादी यांनी आपले कथनांचे पुष्ठयर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

| अ.क्र | वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १ | मौजे महागांव येथील नगर भुमापन क्र.१३१० चे मालमत्ता पत्रक. | ४८ |
| २ | ग्रा.पं.मिळकत क्र. ७१६ चा असेसमेंट उतारा. गट क्र.८९१ चा सन २०१८ ते २०२० सालचा ७/१२ उतारा. | ४९ |
| ३ | गट क्र.८९१ चा सन २०१८ ते २०२० सालचा ७/१२ उतारा. | ५० |
| ४ | खाते क्र.४०९० चा ८–अ उतारा. | ५१ |
| ५ | गट क्र.२२३ चा सन २०१८ ते २०२० सालचा ७/१२ उतारा. | ५२ |
| ६ | खाते क्र.१९७ चा ८अ उतारा. | ५३ |
| ७ | रे.क.क्र.९/२०२३ मधील निशाणी १ वरील आदेश | ५४ |

निशाणी ३० वर पुरसिस दाखल करून वादीने त्याचा पुरावा बंद केला.

**१६.** प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी ३४ वर दाखल केले आहे. तसेच साक्षीदार क्र.२ विजय कमलाकर दंडगे यांचे सरतपासाचे शपथपत्र निशानी ३८ वर व साक्षीदार क्र.३ शंकर परसू घुगरे (प्रतिवादी क्र.२) यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी ४२ वर दाखल केले आहे. प्रतिवादी यांनी आपले कथनांचे पुष्ठयर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

| अ.क्र | वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १ | दावा मिळकतीचे बांधकामाचे फोटो | नि.२० सोबत |
| २ | वाटणीपत्र | नि.४१ |

निशाणी क्र.४४ वर पुरसीस दाखल करुन प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचा पुरावा बंद केला आहे.

**मुद्दे क्र.१ व २ करिता–**

**१७.** सदरील दोन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने वस्तुस्थिती व पुरावा याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी चर्चेस एकत्र घेतले आहेत. दावा मिळकती वडीलोपार्जीत असून त्यामध्ये सरसनिरस मानाने वाटप झाले नाही असे वादी, प्रतिवादी क्र.४ व ६ चे कथन आहे. सदर कथन सिध्द करण्याकरीता वादीने त्यांच्या सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन दाव्यातील कथनांचा पुनर्उच्चार केला आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासात असे कबूल केले आहे की, महागावमध्ये असलेल्या घरात त्यांची पत्नी व मुलासोबत ते राहत होते. त्यांचा मुलगा आत्ता गडहिंग्लज येथे राहत आहे. जनता बँक गल्लीत त्यांचा सख्खा भाऊ शंकर (प्रतिवादी क्र.२) चे घर आहे. ते घर आर.सी.सी. इमारत आहे. शंकरने ते घर त्याच्या स्वत:च्या उत्पन्नातून बांधले आहे. ते राहत असलेल्या घराच्या उत्तरेस व दक्षिणेस रस्ता आहे.

**१८.** त्यांनी उलटतपासात पुढे असे मान्य केले की, ते घरात उत्तरेकडील बाजुस, मध्ये शंकर व दक्षिणेकडील बाजुस प्रतिवादी क्र.१ राहत होते. शंकरने मधला भाग निम्मा त्यांना व निम्मा प्रतिवादी क्र.१ यांना दिला आहे. त्यांनी व प्रतिवादी क्र.१ ने मिळून २५ हजार रुपये शंकरला दिले होते. त्यांनी पुढे असे मान्य केले की, वडील हयात असल्यापासून त्यांचे आर्थिक व्यवहार वेगळे आहेत, तसेच त्यांच्या चुली वेगळया आहेत.

१९. प्रतिवादी क्र.१ ने सन १९९५ पूर्वी वडीलांनी बांधलेल्या घराच्या पाठीमागे असणा–या परडयात घर बांधले होते व ते घर वाटपात त्याला दिले होते म्हणुन प्रतिवादी क्र.१ ला शेत मिळकतीमधील कोणतेही क्षेत्र दिले नव्हते हे त्यांनी नाकारले आहे. तसेच, महागाव येथील शेडूचा झरा या शेतात शंकरची कब्जेवहिवाट व उंबरवाडी येथील तिर्थाकडील शेतात त्यांची कब्जेवहिवाट असल्याचे त्यांनी नाकारले आहे. तसेच, शेडूचा झरा व तिर्थाकडील शेत या दोन्ही शेतात असलेली झाडे त्यांनी तोडून विकली असल्याचे त्यांनी नाकारले आहे. दावा शेत मिळकती कोणीच कसत नाहीत असे त्यांनी कथन केले.

२०. पुढे उलटतपासात त्यांनी असे कथन केले की, मासेवाडी रोडवर केसरकर यांचे २ गुंठयाचे क्षेत्र त्यांच्या मुलाने १० ते १५ वर्षांपूर्वी खरेदी केले आहे. त्यांचा मुलगा १० वर्षापूर्वी शिक्षक म्हणुन नोकरीस लागला आहे. तो प्लॉट खरेदी करण्यासाठी त्यांच्या उत्पन्नातील पैसे त्यांनी दिले होते हे त्यांनी नाकारले आहे. त्या प्लॉटमध्ये त्यांनी जनावरांचे शेड बांधले होते व ते त्याठिकाणी दुभत्या म्हैशी बांधत होते. म्हैशींचे दूध ते त्यांच्या कुटूंबासाठी वापरत होते. त्यांचा मुलगा नोकरीला लागण्यापूर्वी त्यांच्या कुटूंबाच्या खर्चासाठी ते ऊस तोडीचे काम करत होते. त्यांचे उत्पन्न ते त्यांच्याकरीता व त्यांची पत्नी व मुलांकरीता वापरत होते.

२१. त्यांनी पुढे उलटतपासात असे मान्य केले की, दक्षिणेकडील घरात एक न्हाणी घर व एक स्वयंपाक घर आहे व त्याचा वापर ते, त्यांची पत्नी व मुलगा करतात. दक्षिणेकडील घरात पूर्व–पश्चिम रस्त्यालगत सोपा आहे. त्याचा वापर ते, त्यांची पत्नी व मुलगा करतात. घर पाडल्यानंतर २ ते ३ वर्षापूर्वी त्यांनी सोपा, स्वयंपाक घर व न्हाणी घर बांधले आहे. पुढे त्यांनी असे कबूल केले की, त्यांचे वडील वारल्यापासून ते, प्रतिवादी क्र.१ व २ विभक्त राहत आहेत.

२२. प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीचे वाटप दिनांक २६/०५/१९९५ रोजी झाले आहे हे सिध्द करण्याकरीता त्यांचे सरतपासाचे

शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी लेखी कैफियतीमधील कथनांचा पुनर्उच्चार केला आहे. त्यांनी उलटतपासात असे मान्य केले की, दावा मिळकती हया त्यांच्या वडीलांना त्यांच्या भावांसोबत झालेल्या वाटपात मिळाल्या होत्या. दावा मिळकत १अ च्या उत्तरेस गावातील मुख्य रस्ता आहे व दक्षिणेकडील रस्ता गल्लीतला रस्ता आहे. या घर मिळकतीस वडील हयात असेपर्यंत त्यांच्या नावाची नोंद होती. वडील हयात असेपर्यंत त्यांनी त्यांचे किंवा वादीचे नाव मिळकतीस लावण्यासाठी ग्रामपंचायत किंवा सिटी सर्वेला अर्ज दिला नव्हता. तसेच, दावा शेत मिळकतींना मुलांची नावे लागावी म्हणून वडीलांनी मंडळ अधिकारी किंवा तहसिलदार यांच्याकडे अर्ज दिला नव्हता. दावा घर मिळकत म्हणजे दगड मातीचे कौलारु घर आहे. वारसा होईपर्यंत म्हणजेच सन २०२१ पर्यंत घर मिळकतीचा कर वडीलांच्या नावे येत होता. दावा शेतमिळकतींना सर्व वादी व प्रतिवादी यांची नावे ७/१२ उता–यावर नोंद आहेत व त्याबाबत त्यांनी आजपर्यंत तक्रार केली नाही.

**२३.** त्यांनी उलटतपासात पुढे असे कथन केले की, दिनांक २६/०५/१९९५ रोजी वाटपाचे वेळी बहिणींना महागांव येथे बोलाविले नव्हते. त्या वाटपामध्ये बहिणींचा वेगळा हिस्सा काढला नव्हता. वाटप झाल्यानंतर देखील बहिणींचा वाटपास संमती असल्याबाबत दस्त त्यांनी घेतला नव्हता. मुख्य रस्त्यावरील रिकामी जागा त्यांना दिल्यामुळे त्यांना शेतात वडीलांनी हिस्सा दिला नव्हता.

**२४.** त्यांनी पुढे उलटतपासात असे मान्य केले की, वाटपानुसार मुलांची नावे दावा मिळकतींना लागावी म्हणुन महसूल कार्यालयात वडीलांनी अर्ज दिला नव्हता. त्यांनी देखील वाटपाप्रमाणे नाव लागण्यासाठी अर्ज दिला नाही. वाटपासाठी स्टॅम्प त्यांच्या सहिने घेतला होता. दिनांक २६/०५/१९९५ पूर्वी वाटप झाले नव्हते. प्रतिवादी क्र.२ यांना रक्कम रु.२५,०००/– मिळाले याबाबत त्यांनी पावती लिहून दिली नव्हती कारण पैसे मिळाल्याबाबत करारात नमुद केले

होते. दिनांक २६/०५/१९९५ रोजीच्या वाटपपत्रावर (निशाणी ४१) वादीची सही नसल्याचे त्यांनी नाकारले आहे.

**२५.** त्यांनी पुढे उलटतपासात असे कथन केले की, त्यांनी दिलेल्या वर्दी अर्जानुसार घर मिळकतीस सर्वांची नावे नोंद झाली आहेत. वारसाप्रमाणे सर्वांची नावे समाईकात लागली होती. प्रतिवादी क्र.३ व ५ यांना खरेदीपत्र करुन देण्याचा अधिकार नव्हता हे त्यांनी नाकारले आहे. खरेदीपत्रात नमुद केल्याप्रमाणे बहिणींना चतु:सिमापूर्वक निश्चित हिस्सा कधीही दिला नव्हता हे त्यांनी नाकारले आहे. खरेदीपत्रावेळी प्रतिवादी क्र.४ व ६ तसेच वादी यांची संमती घेण्यास त्यांना अडचण होती.

**२६.** आजही दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचा सामाईक हिस्सा व वहिवाट असल्याचे त्यांनी नाकरले आहे. दावा मिळकतींचे आज अखेर सरसनिरस मानाने कायदेशिर वाटप झाले नसल्याचे त्यांनी नाकरले आहे. दिनांक २८/१२/२०२२ रोजी त्यांनी बेकायदेशिरपणे व दांडगाव्याने दावा मिळकतीमधील घर पाडल्याचे त्यांनी नाकारले आहे. दावा मिळकतीमध्ये ते करत असलेले बांधकाम सध्या बंद आहे.

**२७.** प्रतिवादी क्र.१ तर्फे सा.क्र.२ विजय यांनी दिनांक २७/०५/१९९५ रोजीचे वाटपपत्र (नि.४१) लिहिले होते. त्याबाबत त्यांनी सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन असे कथन केले की, दिनांक २७/०५/१९९५ रोजी परसू नाना घुगरे व साक्षीदार हे त्यांच्या घरी आले व परसू नाना घुगरे यांनी त्यांना वाटणीपत्र लिहून देण्याबाबत विनंती केली. त्यानुसार त्यांच्याकडून सर्व माहिती ऐकूण दिनांक २६/०५/१९९५ रोजी प्रतिवादी क्र.१ ने खरेदी केलेल्या रक्कम रु.२०/– च्या स्टॅम्प पेपरवर वाटणीपत्राचा दस्त त्यांच्या हस्ताक्षरात लिहून पूर्ण केला. त्यानंतर, तो दस्त त्यांनी सर्वांना वाचून दाखविला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे मान्य करुन त्यावर परसू नाना घुगरे

यांनी त्यांची मुले व साक्षीदार तसेच त्यांच्या उपस्थितीत अंगठयाचा ठसा उमठविला. त्यानंतर सदरचे वाटणीपत्र मान्य आहे असे कबूल करुन वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या सहया सर्वांसमक्ष व त्यांच्यासमक्ष दस्तावर केल्या. त्यानंतर, परसू नाना घुगरे यांच्या सांगण्यावरुन साक्षीदार धोंडीराम पताडे, भाऊ साळोखे, नारायण देसाई व विठ्ठल कांबळे यांनी त्यांच्या सहया परसू नाना घुगरे, वादी, प्रतिवादी क्र.१ व २ आणि त्यांच्यासमक्ष दस्तावर केल्या.

२८. त्यांनी पुढे असे कथन केले की, परसू नाना घुगरे व इतर साक्षीदार सध्या हयात नाहीत. त्यांना तो दस्त दाखविला असता त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावरील हस्ताक्षर त्यांचे आहे. परसू नाना घुगरे यांनी डाव्या हाताचा अंगठयाचा ठसा त्या दस्तावर उमठविला असून त्यांनी त्यास दस्तूर लिहिला आहे. या साक्षीदाराच्या साक्षीनुसार वाटपपत्र (निशाणी ४१) सिध्द झाले आहे.

२९. त्यांच्या उलटतपासात त्यांनी असे कथन केले की, वाटपाचा कागद लिहिताना कुटूंबातील सर्व मुले व मुली हजर असावी लागतात. निशाणी ४१ वरील दस्त लिहिला तेव्हा परसू घुगरे यांच्या मुली हजर नव्हत्या. दस्तातील मजकुर पंच व साक्षीदार यांनी सांगितल्याप्रमाणे लिहिला होता. त्या दस्तात काय लिहिले आहे हे त्यांना आठवत नाही.

३०. प्रतिवादी क्र.१ तर्फे सा.क्र.३ शंकर घुगरे (प्रतिवादी क्र.२) यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन दिनांक २७/०५/१९९५ रोजी त्यांच्या वडीलांनी लिहून दिलेले वाटणीपत्र त्यांना मान्य व कबूल असल्याचे कथन केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, महागांव येथील तिर्थाकडील शेतजमीन ही वादी यांच्या वाटणीस दिली आहे तर शेडू झ–याकडील शेत त्यांच्या वाटणीस दिले आहे. घराच्या मागील उत्तरेकडील परसू जागा प्रतिवादी क्र.१ ला दिल्याने शेतजमीनीमध्ये त्यांना हिस्सा दिला नव्हता. त्या जागेत प्रतिवादी क्र.१ ने

स्वखर्चाने घर बांधले आहे.

३१. वडिलांनी वाटप करून दिले होते, त्यानुसार त्यांनी त्यांच्या मुलींना प्रतिवादी क्र.३ ते ६ यांना हिस्सा दिला नव्हता. ते वाटप त्यांनी वडिल हयात असताना व त्यांच्या मृत्युनंतर ही आजपर्यंत रद्द व्हावे व त्यांना दावा मिळकतीमध्ये हिस्सा मिळावा या करिता दावा दाखल केला नाही.

३२. त्यांनी पुढे उलटतपासात असे कथन केले की, महागांव येथील कौलारु घरात तीन समान हिस्से केले होते. त्यापैकी त्यांचा १/३ हिस्सा त्यांनी वादी व प्रतिवादी क्र.१ यांना रक्कम रु.२५,०००/– किंमतीस खरेदी दिला आहे. त्यामुळे, त्यांचा सदर घरात हक्क अगर वाटणी राहिली नाही. त्या घरात प्रत्येकी अर्धा हिस्सा वादी व प्रतिवादी क्र.१ यांना दिला आहे. सदर घरातील उत्तरेकडील बाजू प्रतिवादी क्र.१ यांच्या हिस्यास तर दक्षिणेकडील बाजू वादीच्या हिस्यास देण्यात आली आहे.

३३. त्यांनी सरतपासात पुढे असे कथन केले की, वडीलांच्या उदरनिर्वाहाकरीता ते हयात असेपर्यंत त्यांना व वादीस दिलेल्या जमीनीचा उपभोग वडीलांनी घेणेचा असे ठरले होते. प्रतिवादी क्र.१ यांचे हिस्यास देण्यात आलेल्या घरी वडील हयात असेपर्यंत राहणार असेही ठरले होते. वडीलांच्या नावे असलेली रोख रक्कम ते स्वत:साठी खर्च करणार व त्यावर आम्हा ३ भावांचा कोणताही हक्क राहणार नाही असे ठरले होते.

३४. त्यांनी पुढे असे कथन केले की, दिनांक २७/०५/१९९५ रोजीचे वाटणीपत्र त्यांचे वडील व वादी तसेच प्रतिवादी क्र.१ यांच्या समोर वडीलांच्या सांगण्याप्रमाणे समक्ष लिहिले असून त्यावर वडीलांच्या डाव्या हाताचा अंगठा आहे. तो अंगठा ते व त्यांचे भाऊ तसेच पंचांसमक्ष त्यांनी केला होता. वडीलांच्या सांगण्यानुसार पंचांनी वडीलांसमक्ष व त्यांच्यासमक्ष सहया केल्या होत्या. त्यांचे

वडील व वाटपपत्रावरील साक्षीदार आत्ता हयात नाहीत. तो दस्त (निशाणी ४१) त्यांना दाखविला असता त्यातील मजकुर बरोबर असल्याचे त्यांनी कथन केले आहे. तसेच, त्यावर त्यांची व त्यांच्या भावांच्या तसेच पंचांच्या सहया व वडीलांचा अंगठा असल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांनी व त्यांच्या भावांनी त्यांच्या सहया पंचांसमक्ष व वडीलांसमक्ष केल्या होत्या.

**३५.** त्यांनी उलटतपासात असे कथन केले आहे की, दावा घर मिळकत वडीलार्जीत आहे. वाटणीपत्र झाल्यानंतर त्यांनी तलाठीकडे किंवा ग्रामपंचायतीमध्ये वर्दी अर्ज दिला नव्हता. दिनांक २७/०५/१९९५ रोजी त्यांच्या ४ बहिणी त्यांच्या घरी आल्या नव्हत्या. त्यानंतर देखील दिनांक २७/०५/१९९५ रोजीच्या वाटपपत्रास बहिणींनी लेखी संमती दिलेली नाही. दिनांक २७/०५/१९९५ पूर्वी त्यांच्यामध्ये वाटप झाले नव्हते. दावा घर मिळकतीच्या उत्तरेस महागांव गावातील मुख्य रस्ता आहे.

**३६.** त्यांनी पुढे उलटतपासात असे कथन केले की, सन २०२३ मध्ये त्यांनी प्रतिवादी क्र.१ ला दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन दिले आहे. सन १९९५ नंतर त्यांनी दावा घर मिळकतीमध्ये त्यांचा निम्मा हिस्सा वादी व निम्मा हिस्सा प्रतिवादी क्र.१ यांना दिला होता. तसा वर्दी अर्ज त्यांनी दिला नव्हता. त्यांना वादी व प्रतिवादी क्र.१ कडून घराचे २५ हजार रुपये मिळाले म्हणुन त्यांनी पावती लिहिली नव्हती. वाटणीपत्र (नि.४१) त्यांनी व प्रतिवादी क्र.१ ने खोटे तयार केले असल्याचे त्यांनी नाकारले आहे.

**३७.** वरील वादी व प्रतिवादी यांच्या तोंडी पुराव्यानुसार अभिलेखावर दाखल कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. दावा घर मिळकतीच्या मालमत्तापत्रकाचे (निशाणी ४८) अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा घर मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या नावे परसू घुगरे यांच्या मृत्युनंतर वारस म्हणुन नोंद करण्यात आली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.२, ३ व ५ यांनी

त्या मिळकतीमधील त्यांचे प्रत्येकी १८ चौ.मी. क्षेत्र दिनांक २३/०९/२०२२ रोजीच्या नोंदणीकृत दस्त क्र.३५३८ ने प्रतिवादी क्र.१ यांना विक्री केल्याने त्यांच्या एकुण ५४ चौ.मी. क्षेत्रास प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.१०७६ नुसार दिनांक ११/११/२०२२ रोजी करण्यात आली आहे. दावा घर मिळकतीच्या सन २०२२–२३ सालच्या करआकारणी उता–याचे अवलोकन केले असता त्यात वादी व प्रतिवादी यांची नावे परसू घुगरे यांचे वारस म्हणुन दाखल आहेत. तसेच, दावा शेत मिळकतींना वादी व प्रतिवादी यांची नांवे सामाईक क्षेत्र म्हणुन नोंद आहेत. तसे ७/१२ उतारे व ८–अ उतारे निशाणी क्र.५० ते ५३ वर दाखल आहेत.

**३८.** वादीतर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.१ ने सन १९९५ पुर्वी घर बांधले, ते कधी बांधले, पुर्वी वाटप झाले होते का, ते कधी झाले होते याबाबत कोणताही पुरावा वादीने दिला नाही. सन २०२१ मध्ये वारसांची नावे दावा मिळकतीत नोंद केली आहेत व दावा मिळकतींमधील बहिणींचा हिस्सा खरेदी केला आहे, यावरून पुर्वी वाटप झाले होते हे त्यांचे कथन चुकीचे असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी क्र.१ ने बहिणींचेकडून करून घेतलेल्या खरेदीपत्रास वादीची संमती नव्हती. यावरून जबरदस्तीने वाटप झाले आहे असे दिसुन येते. प्रत्येकाला वेगवेगळी मालमत्ता घेण्याचा हक्क आहे. वादी वेगळा राहतो, म्हणजे वाटप झाले असा होत नाही. वाटणीपत्र (नि.४१) नोंदणीकृत नाही, त्याकरिता पुरेसा स्टॅम्प दिला नाही.

**३९.** पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, वाटपपत्रातील मजकुराप्रमाणे वादी, प्रतिवादी क्र.१ व २ यांना मर्यादित मालकी दिली आहे, त्यामुळे ते वाटप होणार नाही. त्या वाटपपत्राचा अंमल सन १९९५ पासुन झाला नाही, त्यामुळे त्याचा अंमल आता करता येणार नाही. प्रतिवादी करत असलेले कथन संयुक्तीक नाहीत. वाटप झाले नसताना प्रतिवादी क्र.१ ला बांधकाम करता येणार नाही. प्रतिवादीने केलेले कथन सिद्ध केले नाहीत. वादीने केलेले कथन सिद्ध केले

आहेत. म्हणून दावा मंजुर करावा अशी विनंती त्यांनी केली.

**४०.** प्रतिवादी क्र.१ तर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादीचे वडिल सन २००५ मध्ये मयत झाले. त्यानंतर १८ वर्षानी दावा दाखल केला आहे. मुदतीच्या कायद्याप्रमाणे दावा १२ वर्षात दाखल केला नाही, त्यामुळे दाव्यात मुदतीच्या कायद्याची बाधा येते. लेखी कैफियतीमध्ये वाटप पत्राचा उल्लेख केल्यानंतर देखील वादीने दाव्यात त्याबाबत कोणतेही कथन केले नाही. वादीने महत्वपुर्ण तथ्य न्यायालयापासुन लपवून ठेवली आहेत. निशाणी ४१ वरील वाटप पत्राचे अवलोकन केले असता वादी, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यामध्ये त्यांच्या वडिलांनी ह्यात असताना वाटप करून दिले होते व त्याप्रमाणे त्यांच्या वहिवाटी आहेत. वादीने स्वयंपाक घर व न्हाणी नवीन बांधली आहे. प्रतिवादी क्र.१ ने त्यास हरकत घेतली नाही, कारण ते त्याच्या हिस्स्याला दिले होते.

**४१.** त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, रे.क.क्र.९/२०२३ मध्ये वाटपाची दाद मागितली नसल्याने दावा नामंजुर झाला असता, म्हणून तो दावा काढुन घेऊन हा दावा दाखल केला आहे. वाटपपत्र खरे नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी वादीची आहे. वादीतर्फे प्रतिवादी क्र.१ च्या घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान सुचक प्रश्न विचारताना वाटप झाले असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. प्रतिवादी क्र.१ ने पुर्वी वाटप झाले आहे हे सिद्ध केले आहे. त्यामुळे आता पुन्हा वादीस वाटप मागण्याचा हक्क नाही. त्यामुळे दावा नामंजुर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली. प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे–

*अ) वेणुबाई नथु उर्फ देवीदास मानकर व इतर विरुध्द विमलाबाई केशवराव ठाकरे, २०१३ (३) एमएचएलजे ८९५* या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालय यांनी श्री. सोहोनी यांनी आधार मानलेल्या, मुल्ला यांच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ हिंदू लॉ च्या परिच्छेद ३२२ मधील तरतुदीचा संदर्भ घेतला आहे तो पुढीलप्रमाणे :–

३२२. वाटप म्हणजे काय—अविभक्त मिताक्षरा कुटुंबाच्या खऱ्या संकल्पनेनुसार, जोपर्यंत ते कुटुंब अविभक्त आहे, तोपर्यंत त्या कुटुंबातील कोणताही वैयक्तिक सदस्य संयुक्त मालमत्तेबद्दल असे प्रतिपादन करू शकत नाही की, त्याचा—त्या विशिष्ट सदस्याचा—एक निश्चित हिस्सा, एक तृतीयांश किंवा एक चतुर्थांश आहे. त्या कायद्यानुसार, वाटप म्हणजे मालमत्तेची संख्यात्मक विभागणी; म्हणजेच, त्यात संयुक्त मालमत्तेतील सहदायकांचे हिस्से निश्चित केले जातात; मालमत्तेची सरस–निरस मानाने प्रत्यक्ष विभागणी करणे आवश्यक नाही. एकदा हिस्से निश्चित झाले की, मग ते सदस्यांमधील करारानुसार असो वा अन्य मार्गाने, वाटप पूर्ण होते. अशा प्रकारे हिस्से निश्चित झाल्यावर, सदस्य मालमत्तेचे सरस–निरस मानाने विभागणी करू शकतात, किंवा ते पूर्वीप्रमाणेच एकत्र राहून मालमत्तेचा सामाईकपणे उपभोग घेऊ शकतात. परंतु ते एक किंवा दुसरे काहीही करोत, त्याचा परिणाम केवळ उपभोगाच्या पद्धतीवर होतो, मालमत्तेच्या मालकी हक्कावर नाही. हिस्से निश्चित होताच मालमत्ता तात्काळ संयुक्त राहत नाही.

ब) *प्रभाकर राजारामजी लांबट वि. शांताराम राजारामजी लांबट २००९ (६) एमएच.एल.जे.७१.* सदर न्यायनिर्णयामध्ये वाटप दस्त नोंदणीकृत होता. त्यामध्ये बराजारामच्या मृत्युनंतर वाटपदस्तातील मजकुराप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ यांना प्रत्येकी समान १/३ हिस्सा मागणी करत होता. तर प्रतिवादी क्र. १ हा राजारामच्या मृत्युपत्राआधारे संपूर्ण दावा मिळकत त्याची आहे अशी मागणी करत होता. माझ्या हातातील प्रकरणात नोंदणीकृत वाटपपत्र तसेच मृत्युपत्रानुसार वाटप हे मुद्दे वादातीत नाहीत. म्हणुन मी आदरपुर्वक नमुद करू इच्छीते की, सदर न्यायनिर्णय या प्रकरणास लागु होत नाही.

क) *बिहारीलाल रामप्रसाद वि. महाराष्ट्र शासन व इतर १९८४ एमएच.एल.जे.७२९.* सदर न्यायनिर्णयामध्ये वडील व अज्ञान मुलगा यांच्यामधील वाटपास कायदेशीर अडथळा नाही असे निर्देशीत केले होते. अशा स्वरूपाचा मुद्दा माझ्या हातातील प्रकरणात वादातीत नाही. म्हणुन मी आदरपुर्वक नमुद करू इच्छीते की, सदर न्यायनिर्णय या प्रकरणास लागु होत नाही.

४२. यावरुन वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकती समाईकात आहेत असे दिसुन येते. परंतु, प्रतिवादी क्र.१ ने कथन केल्याप्रमाणे त्याने दिनांक २७/०५/१९९५ रोजीचे वाटणीपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. ते वाटणीपत्र नोंदणीकृत नाही. ते वाटणीपत्र नोंदणीकृत नाही म्हणून ते पुराव्यात वाचता येणार नाही असा आक्षेप वादीतर्फे विधीज्ञ यांनी पुरावा नोंदविताना घेतला नाही. ते वाटणीपत्र प्रतिवादीतर्फे सा.क्र.२ विजय व सा.क्र.३ शंकर यांच्या साक्षीदरम्यान सिध्द झाले आहे. त्यामुळे त्यांनी त्याबाबत केलेला युक्तीवाद ग्राह्य धरता येणार नाही.

४३. वाटणीपत्र (निशाणी ४१) चे अवलोकन केले असता त्यामध्ये असा मजकुर नमुद आहे की, वादी व प्रतिवादीचे वडील यांनी ते वाटणीपत्र त्यांच्या मुलांना स्थावर व जंगम मालमत्तेची वाटणी करुन लिहून ठेवले आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, त्यांच्या ४ मुलींची लग्ने झाली असून त्या आज रोजी सुखाने नांदत आहेत. त्यांना वादी, प्रतिवादी क्र.१ व २ ही मुले आहेत. त्यांनी त्यांच्या मिळकतींची वाटणी खालीलप्रमाणे केली आहे. महागांव येथील तिर्थाकडील शेत वादीच्या वाटणी हिस्यास व शेडू झ–याकडील शेत प्रतिवादी क्र.२ च्या वाटणी हिस्यास दिले आहे. प्रतिवादी क्र.१ च्या हिस्यास घराच्या मागील परसू दिली आहे, म्हणुन त्यास वरील शेत मिळकतीमध्ये हिस्सा दिला नाही. सदर जागेवर त्याने स्वखर्चाने घर बांधले आहे. महागांव येथील साधे कौलारु राहते घराचे तीन समान हिस्से केले होते. त्यापैकी प्रतिवादी क्र.२ यांनी त्याचा १/३ हिस्सा वादी व प्रतिवादी क्र.२ यांना रोख रक्कम रु.२५,०००/– किंमतीस खरेदी दिला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२ ची सदर घरात हक्क अगर वाटणी राहिली नाही. या घरात वादी व प्रतिवादी क्र.१ यांना प्रत्येकी १/२ हिस्सा दिला आहे. सदर घराची उत्तरेकडील बाजू प्रतिवादी क्र.१ यांच्या वाटणीस व दक्षिणेकडील बाजू वादी यांच्या वाटणीस दिली आहे. तसेच, दोन्ही शेतातील झाडे वादी व प्रतिवादी क्र.२ यांना समान दिली आहेत. प्रतिवादी क्र.१ ला शेडू शेतातील सागवानचे झाड दिले आहे.

४४. वडिल एकत्र कुटुंबात राहत होते असे वादीने कथन केले आहे, पण ते हयात असेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ला हिस्स्यात दिलेल्या घरात राहणार तसेच वादी व प्रतिवादी क्र.२ ला दिलेले शेत कसणार या वाटपपत्रातील मजकुरावरून हे दिसुन येते की, ते वादी, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यासोबत एकत्र कुटुंबात राहत नव्हते व त्यांचे वाटप झाले होते. दावा मिळकती वादी व प्रतिवादी समाईकांत उपभोगत आहेत असे दाखविण्यासाठी वादीने कोणताही पुरावा दिला नाही.

४५. पुढे त्यामध्ये असे कथन केले आहे की, त्यांच्या व कुटूंबाच्या उदरनिर्वाहाकरीता वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या वाटणीस दिलेल्या जमीनीचा उपभोग ते हयात असेपर्यंत घेणार आहेत. तसेच, प्रतिवादी क्र.१ च्या वाटणीस दिलेल्या घरी हयात असेपर्यंत ते राहणार आहेत. त्यांच्या नांवे असलेली रोख रक्कम ते स्वत: खर्च करणार आहेत. त्यात त्यांच्या मुलांचा हक्क राहणार नाही. सदर वाटणीपत्र त्यांनी पंचांसमक्ष व मुलांच्या पुर्ण संमतीने लिहिले आहे. सदर वाटणीपत्र त्यांना व त्यांच्या मुलांना मान्य आहे. त्यावर त्यांचा डाव्या हाताचा अंगठा तसेच वादी, प्रतिवादी क्र.१ व २ तसेच ४ साक्षीदारांच्या सहया दिसुन येतात.

४६. या वाटणीपत्राचे वाचन केले असता असे दिसुन येते की, परसू घुगरे यांनी त्यांच्या मुलांमध्ये करुन दिलेले वाटप यामध्ये लिहून ठेवले आहे. त्याकरिता ते दस्त नोंदणीकृत असण्याची गरज नाही. याठिकाणी *पी. अंजनाप्पा (मयत) वारसांतर्फे विरुध्द ए. पी. ननजुंडाप्पा व इतर,* २०२५ आयएनएससी १२८६ या न्यायनिर्णयाचा संदर्भ मी येथे घेत आहे. या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निर्देशीत केले आहे की, लेखी स्वरुपात नोंदवलेल्या कौटुंबिक व्यवस्थे नंतर पक्षकारांनी मालमत्ता कशी धारण केली आणि तिचा उपभोग कसा घेतला हे स्पष्ट करण्यासाठी त्यावर अवलंबून राहता येते, तेव्हा त्या मर्यादित पूरक वापरासाठी (colateral use) नोंदणीची आवश्यकता नसते. अनोंदणीकृत वाटपपत्राच्या अंमलबजावणीनंतर, दीर्घकाळ चाललेला आणि सातत्यपूर्ण व्यवहारक्रम संयुक्त

कुटुंबाच्या विघटनाच्या वास्तवाला पुष्टी देतो. पक्षकार वेगळे राहत होते आणि स्वतंत्रपणे स्वयंपाक करत होते. त्यांनी वेगवेगळ्या गावांमध्ये वेगवेगळे सर्व्हे क्रमांक कसले होते. वादीने मालक म्हणून आपल्या जमिनींचा व्यवहार केला, ज्यात गहाण आणि नंतरचे व्यवहार यांचा समावेश होता. या सर्व एकत्रित घटना या गोष्टीला दुजोरा देते की, कुटुंब एकत्र राहिले नाही आणि त्यानंतर प्रत्येक शाखेने अनोंदणीकृत वाटपपत्राद्वारे त्यांना वाटप केलेल्या मालमत्तेचा स्वतंत्रपणे ताबा घेतला व तिचा उपभोग घेतला.

**४७.** या न्यातत्वानुसार निशाणी क्र.४१ वरील वाटणीपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांचे वडील परसू घुगरे यांनी त्यामध्ये कथन केले आहे की, महागांव येथील साधे कौलारु राहते घराचे तीन समान हिस्से केले होते. त्यापैकी प्रतिवादी क्र.२ यांनी त्याचा १/३ हिस्सा वादी व प्रतिवादी क्र.२ यांना रोख रक्कम रु.२५,०००/- किंमतीस खरेदी दिला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२ ची सदर घरात हक्क अगर वाटणी राहिली नाही. या घरात वादी व प्रतिवादी क्र.१ यांना प्रत्येकी १/२ हिस्सा दिला आहे. सदर घराची उत्तरेकडील बाजू प्रतिवादी क्र.१ यांच्या वाटणीस व दक्षिणेकडील बाजू वादी यांच्या वाटणीस दिली आहे. तसेच, दावा शेत मिळकती देखील वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या वाटणीस दिलेल्या आहेत असे नमुद केले आहे.

**४८.** वादी यांनी त्यांच्या उलटतपासात प्रतिवादी क्र.२ जनता बँक गल्लीत त्याच्या स्वत:च्या उत्पन्नातून घर बांधून राहत आहे हे मान्य केले आहे. वादी राहत असलेल्या घरात त्यांची पत्नी व मुलासोबत ते राहतात. दावा घर मिळकतीमध्ये उत्तरेकडील बाजू त्यांना, दक्षिणेकडील बाजू प्रतिवादी क्र.१ ला व मध्ये प्रतिवादी क्र.२ ला हिस्सा देण्यात आला होता. त्यांची वाटणी झाली नाही असे सांगताना प्रतिवादी क्र.२ ने त्यांचा हिस्सा वादीस व प्रतिवादी क्र.१ ला रक्कम रु.२५,०००/- घेऊन दिला आहे हे त्यांनी मान्य केले आहे.

४९. तसेच, प्रतिवादी क्र.१ तर्फे सा.क्र.३ शंकर यांनी देखील त्यांच्या सरतपासात त्यांनी त्यांचा घर मिळकतीमधील हिस्सा रक्कम रु.२५,०००/– किंमतीस वादी व प्रतिवादी क्र.१ यांना खरेदी दिला असल्याने त्यांची त्यामध्ये वाटणी राहिली नाही, तसेच त्या घरात वादी व प्रतिवादी क्र.१ चा निम्मा–निम्मा हिस्सा आहे असे कथन केले आहे. वादीने स्वत: रक्कम रु.२५,०००/– त्यांनी व प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला घराच्या हिस्याच्या मोबदल्यात दिली होती हे मान्य केले असल्याने त्याबाबत प्रतिवादी क्र.२ ने त्यांना पावती लिहून दिली नव्हती या वादीतर्फे उलटतपासात प्रतिवादी क्र.२ ला विचारलेल्या प्रश्नाला अर्थ राहत नाही.

५०. यावरुन हे स्पष्टपणे दिसुन येते की, या दस्तात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ला घराच्या मागील परसू जागा दिली असल्याने त्याला शेत मिळकतीमध्ये हिस्सा दिला नाही. प्रतिवादी क्र.१ ने शेत मिळकतींमध्ये त्याला हिस्सा मिळावा असे कथन केले नाही.

५१. प्रतिवादी क्र.२ ने त्याचा घर मिळकतीमधील हिस्सा विक्री केला व जनता गल्लीत स्वत: घर बांधून तो राहत आहे, तसेच वादीने देखील त्याला दक्षिणेकडील मिळालेल्या घर मिळकतीत सोपा, स्वयंपाक घर व न्हानी घर बांधून ती मिळकत तो त्याच्यासाठी व त्याच्या कुटूंबासाठी उपभोगत आहे असे स्पष्टपणे मान्य केले आहे. वाटपपत्रात प्रतिवादी क्र.१ ला शेताच्या मोबदल्यात दिलेल्या घराच्या मागील जागेत त्याने स्वखर्चाने घर बांधले आहे असा मजकुर नमुद आहे.

५२. प्रतिवादी क्र.१ ने असे त्याच्या उलटतपासात दिनांक २७/०५/१९९५ पूर्वी त्यांच्यामध्ये वाटप झाले नव्हते असे कथन केले असले तरी दिनांक २७/०५/१९९५ रोजी त्यांच्यात वाटप झाले हे त्याचे कथन योग्य असल्याचे दिसुन येते. वादीने त्याच्या उलटतपासात हे स्पष्टपणे मान्य केले आहे की, वडील हयात असल्यापासून त्यांचे आर्थिक व्यवहार वेगळे आहेत. तसेच,

त्यांच्या चुली वेगळया आहेत. त्यांचे उत्पन्न ते त्यांच्या कुटूंबाकरीता वापरत होते. त्यांचे वडील वारल्यापासून ते, प्रतिवादी क्र.१ व २ विभक्त राहत आहेत. वादी व प्रतिवादी यांचे वडील दिनांक २९/०७/२००५ रोजी मयत झाले असे वादीचे दाव्यात कथन आहे. म्हणजेच २० वर्षापूर्वीपासून वडील हयात असल्यापासून वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांचे सर्व आर्थिक व्यवहार तसेच स्वयंपाक करुन विभक्त राहणे चालू आहे. यावरुन त्यांचे वाटप वडील हयात असतानाच झाले होते हे स्पष्टपणे दिसुन येते.

**५३.** वादीने उलटतपासात हे मान्य केले आहे की, त्याठिकाणी असलेले घर पाडून प्रतिवादी क्र.१ तिथे नवीन घर बांधत आहे. प्रतिवादी क्र.१ सन २०२३ पासून शिंदे यांच्या घरी भाडयाने राहत आहे. घर पाडल्यानंतर २ ते ३ वर्षापूर्वी त्यांनी सोपा, स्वयंपाक घर व न्हानी घर बांधले आहे. ते बांधत असताना त्यांनी प्रतिवादी क्र.१ ते ६ यांची संमती घेतली नव्हती. यावरुन हे स्पष्टपणे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ हे त्यांच्या हिस्यास आलेले घर व त्यांनी त्यांच्या स्वखर्चाने सन १९९५ पूर्वी बांधलेले घर पाडून त्याठिकाणी नवीन घर बांधत आहेत.

**५४.** वादीस उलटतपासादरम्यान प्रतिवादींतर्फे दाखल केलेल्या घराचा फोटो दाखविला असता त्यांनी हे मान्य केले की, तो फोटो ते राहत असलेल्या घराच्या पाठीमागील बाजुचा असून पाठीमागील असणारी चौकट बंद आहे. तसेच, त्यांना दाखविलेला दुसरा फोटो पाहून तो फोटो त्यांच्या राहत असलेल्या घराचा असल्याचे त्यांनी मान्य केले. त्या दोन्ही फोटोवरुन असे दिसुन येते की, वादी राहत असलेले घर दुपाकी असून त्याच्या घरासमोर रस्ता आहे. घराच्या पाठीमागील चौकट बंद असल्याचे त्यांनी सांगितले. यावरुन पाठीमागील बाजूस त्यांची वहिवाट नाही असे दिसुन येते व त्या पाठीमागील बाजूस प्रतिवादी क्र.१ घराचे बांधकाम करत असल्याचे दिसुन येते.

**५५.** वादीतर्फे विधिज्ञ यांनी उलटतपासात प्रतिवादी क्र.१ ला प्रश्न विचारला की दावा शेतमिळकतीत त्यांना हिस्सा का दिला नाही असे वडिलांना तुम्ही विचारले का ? या प्रश्नाला उत्तर देताना प्रतिवादी क्र.१ ने सांगितले की, मुख्य रस्त्यावरील जागा त्यांना दिल्यामुळे त्यांना शेतात हिस्सा दिला नव्हता. तसेच त्यांनी उलटतपासात प्रतिवादी क्र. १ ला वाटपास अनुसरून अनेक प्रश्न विचारले जसे की वाटपाप्रमाणे नाव लागण्यासाठी त्यांनी अर्ज दिला नव्हता, वाटपाच्या वेळी बहिणींना महागांव येथे बोलावले नव्हते, वाटपामध्ये त्यांचा वेगळा हिस्सा काढला नव्हता, वाटप झाल्यानंतर देखील बहिणींची वाटपास संमती असल्याबाबत दस्त घेतला नव्हता, वाटपासाठी स्टॅम्प त्यांच्या सहीने घेतला होता. यावरून वाटप झाले होते हे वादीस मान्य असल्याचे दिसुन येते.

**५६.** प्रतिवादी क्र. ४ व ६ यांनी निशाणी ३५ वर कैफियत दाखल करून वादीच्या दाव्यातील कथन मान्य केले आहे. प्रतिवादी क्र.४ व ६ यांनी त्यांचे वडील मयत झाल्यानंतर आजपर्यंत दावामिळकतीमध्ये वाटप मागितले नाही. दावा मिळकतीच्या वडीलांनी करून दिलेल्या वाटपामध्ये त्यांचा हिस्सा वगळला आहे किंवा त्याची माहिती त्यांना कधी झाली आहे याबाबत त्यांनी कोणतेही कथन केले नाहीत. वादीचा पुरावा पुर्ण झाल्यानंतर त्यांनी याकामी लेखी कैफियत दाखल केली आहे. त्यामध्ये त्यांनी प्रतिवादी क्र.३ व ५ यांनी प्रतिवादी क्र.१ च्या लाभात करून दिलेल्या खरेदीपत्राबाबत वाद उपस्थीत केला नाही.

**५७.** मुदतीचा कायदा,१९६३ अर्टिकल ११० प्रमाणे त्यांना दावा मिळकतीमधुन वगळल्यापासुन बारा वर्षाच्या आत त्यांनी मिळकतीमध्ये हिस्सा मिळण्यासाठी दावा दाखल करणे गरजेचे असते. त्यांचे वडील दिनांक २९/०७/२००५ रोजी मयत झाले आहेत. त्यानंतर देखील त्यांनी, मिळकतीमध्ये हिस्सा मिळण्यासाठी दावा दाखल केला नाही.

**५८.** वादीतर्फे विधिज्ञ यांनी मुल्ला हिंदु लॉ २१ वी आवृत्ती मधील परिच्छेद क्रमांक ३२२ चा संदर्भ घेतला आहे. त्याचे मी अवलोकन केले, त्यानुसार एकत्र कुटुंबातील वडीलांना कुटुंबाची मिळकत त्यांच्या हयातीत कोणत्याही वेळेस विभाजन करून देण्याचा हक्क असतो व त्यानुसार त्यांनी त्यांच्या मुलांना समान हिस्सा दिला असेल तर, कायदयानुसार वडील मुलांपासुन व मुले एकमेकांपासुन वेगळी होतात. वडीलांना या त्यांच्या शक्तीचा वापर करण्यासाठी मुलांच्या संमतीची गरज नसते.

**५९.** यानुसार वादी व प्रतिवादी यांच्या वडीलांनी त्यांच्या हयातीत वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांना सन १९९५ पूर्वी वाटप करून दिले होते. तसे वाटप करून देण्यासाठी त्यांना मुलांच्या संमतीची गरज नाही. त्या वाटपानुसार वादी तसेच प्रतिवादी क्र. १ व २ हे त्यांचा हिस्सा उपभोगत आहेत. यावरून वेगळे राहण्याचा त्यांचा हेतु स्पष्ट होतो.

**६०.** या सर्व पुराव्यावरुन व  वरील *वेणुबाई मानकर* या न्यायनिर्णयातील न्यायतत्वानुसार असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांच्या वडीलांनी करुन दिलेल्या वाटपाप्रमाणे त्यांच्या वहिवाटी दावा मिळकतीमध्ये आहेत व त्यानुसार ते त्याचा उपभोग घेत आहेत. जेव्हा वाटप होऊन त्यांचे दावा मिळकतीमधील हिस्से निश्चित करण्यात आले तेव्हा वाटप पूर्ण झाले. वाटप झाल्यानंतर ते एकत्र राहिले किंवा मिळकतीचा उपभोग सामाईकात घेतला म्हणजे वाटप झाले नव्हते असे होत नाही. वाटपानंतर मिळकत सामाईकात उपभोगायचे की स्वतंत्रपणे उपभोगायचे हे ते ठरवू शकतात. त्याचा झालेल्या वाटपावर कोणताही परिणाम होत नाही. यानुसार वादी, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यात वाटप होवून हिस्से निश्चित झाल्यानंतर दावा मिळकत त्यांच्या एकत्र कुटुंबाची राहत नाही. ते दावा मिळकतींचा उपभोग घेतात त्याप्रमाणे महसूल दप्तरी नोंद झाली नाही म्हणुन त्यांच्यामध्ये वाटप झाले नाही असे म्हणता येणार नाही. यावरुन हे सिध्द होते की, वादी व प्रतिवादी यांचे वडील हयात असताना वादी व प्रतिवादी क्र.१ व २

यांच्यामध्ये वाटप झाले आहे व त्या वाटपानुसार ते त्यांच्या हिस्यास दिलेल्या मिळकतींचा उपभोग घेत आहेत. त्यामुळे, दावा मिळकतीमध्ये वाटप व तुटक कब्जा मागण्यास वादी पात्र नाही. त्यानुसार मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष मी नकारार्थी व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा क्र.३ करीता –**

**६१.** मुद्दा क्र.१ व २ च्या चर्चेवरुन हे सिध्द झाले आहे की, वादी व प्रतिवादी यांचे वडील हयात असताना त्यांच्यामध्ये दावा मिळकतीचे वाटप झाले होते. त्यानुसार, ते दावा मिळकतींचा उपभोग घेत आहेत. प्रतिवादी क्र.१ ने एकत्र कुटूंबाची घर मिळकत पाडून त्याठिकाणी बांधकाम करत आहे असे वादीने सिध्द केले नाही. वडील हयात असल्यापासून ते, प्रतिवादी क्र.१ व २ विभक्त राहत आहेत हे वादीने मान्य केले आहे.

**६२.** यानुसार, दावा घर मिळकतीच्या मालमत्तापत्रकाचे (निशाणी ४८) अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा घर मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या नावे परसू घुगरे यांच्या मृत्युनंतर वारस म्हणुन नोंद करण्यात आली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.२, ३ व ५ यांनी त्या मिळकतीमधील त्यांचे प्रत्येकी १८ चौ.मी. क्षेत्र दिनांक २३/०९/२०२२ रोजीच्या नोंदणीकृत दस्त क्र.३५३८ ने प्रतिवादी क्र.१ यांना विक्री केल्याने त्यांच्या एकुण ५४ चौ.मी. क्षेत्रास प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.१०७६ नुसार दिनांक ११/११/२०२२ रोजी करण्यात आली आहे. हे ज्ञान वादीला दावा दाखल करताना होते. तरीही ते खरेदीपत्र रद्द करावे किंवा ते खरेदीपत्र वादीच्या हक्कावर बंधनकारक नाही असे जाहीर करून मिळावे अशी देखील विनंती वादीने दाव्यात केली नाही.

**६३.** दावा मिळकतींचे वाटप झाल्यानंतर त्यामधील प्रत्येकाचे हिस्से हद्दी निश्चित करुन निश्चित करणे गरजेचे नसते. दावा घर मिळकतीच्या मालकत्तापत्रकी

वादी व प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा प्रत्येकी १८ चौ.मी. हिस्सा आहे असे नोंद करण्यात आले आहे. त्यापैकी प्रतिवादी क्र.२, ३ व ५ यांनी त्यांचा हिस्सा प्रतिवादी क्र.१ ला नोंदणीकृत दस्ताने खरेदी दिल्याने त्या क्षेत्रास प्रतिवादी क्र.१ चे नांव नोंद करण्यात आले आहे. असे असले तरी वादीच्या हिस्यास आलेल्या घर मिळकतीच्या हिस्यावर त्याचा कोणताही परिणाम झाल्याचे दिसुन येत नाही. तो दावा घर मिळकतीत सोपा, स्वयंपाक घर व न्हानी घर बांधून त्या घरात तो त्याच्या पत्नी व मुलासह राहत आहे. प्रतिवादी क्र.२ ने त्याचा घर मिळकतीमधील निम्मा हिस्सा प्रतिवादी क्र.१ ला विक्री केल्याचे कथन केले आहे. यावरुन हे सिध्द होते की, दावा मिळकत १अ मधील प्रतिवादी क्र.२, ३ व ५ यांच्या हिस्याचे क्षेत्र प्रतिवादी क्र.१ ने खरेदी केले आहे. त्यानुसार, मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दे क्र.४ व ५ करीता–**

**६४.** सदरील दोन्ही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने ते चर्चेसाठी एकत्रीत घेतले आहेत. वरील सर्व चर्चेवरून हे सिद्ध होते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतीचे वाटप झाले होते. त्यानुसार वादी, प्रतिवादी क्र.१ व २ हे त्यांचे हिस्से वहिवाटीत आहेत. प्रतिवादी क्र.१ ला दावा शेतमिळकतींमध्ये हिस्सा दिला नाही, त्यामुळे त्या शेतमिळकतीमध्ये त्याचा हिस्सा आहे असे त्यांचे कथन नाही. प्रतिवादी क्र. १ हे त्यांना वाटपात दिलेल्या हिश्यात त्यांचे राहते घर पाडुन त्याठिकाणी नवीन घराचे बांधकाम करत आहेत. त्यामुळे वादी यांच्या घरमिळकतींमधील हिश्यास प्रतिवादी हरकत व अडथळा करत नाहीत. तसेच प्रतिवादी क्र. २ ने दावा घरमिळकतीमधील त्याचा हिस्सा वादी व प्रतिवादी क्र. १ ला विकल्याने त्याने देखील दावा घरमिळकतीत त्याचा हिस्सा नाही हे मान्य केले आहे. प्रतिवादी क्र.१ व २ हे वादीस दावा शेत मिळकतीमधील वहिवाटीस अडथळा करतात असे वादीचे कथन नाही. यावरून प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये वादी यांच्या असलेल्या शांततामय वहिवाटीस हरकत व अडथळा केला हे वादीने सिद्ध केले नाही.

६५. प्रतिवादी क्र.२ जनता गल्लीत स्वत:चे घर बांधून राहत आहे हे वादीने कबूल केले आहे. प्रतिवादी क्र.१ बांधकाम करीत असताना त्यांनी वादीस त्यांच्या राहत्या घरातुन बाहेर काढले किंवा हुसकावून लावले असे कृत्य त्यांनी केले असे वादीने सिद्ध केले नाही. वादी, प्रतिवादी क्र.१ व २ यांची वहिवाट वेगळी असल्याने प्रतिवादी क्र.१ व २ ने वादी यांची दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करून त्यांना दावा मिळकतीमधून हुसकावून लावण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. म्हणुन वादी प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या विरूध्द कायम मनाई मागण्यास पात्र नाहीत. या सर्व चर्चेस अनुसरून मी मुद्दा क्र.४ व ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवला आहे.

**मुद्दा क्र.६ करीता–**

६६. वादीने हा दावा दाखल करण्यापूर्वी रे.क.क्र.९/२०२३ हा दावा दाखल केला होता. तो दावा वादीने काढुन घेतलेबाबतचा निशाणी १ वरील आदेशाची साक्षांकित प्रत निशाणी ५४ वर दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता, असे दिसुन येते की तो दावा वादीने सदर प्रतिवादी क्र.१ व इतर यांच्याविरूध्द कायम मनाई आदेश मिळवण्यासाठी दाखल केला होता. त्या दाव्यात प्रतिवादी तर्फे असा आक्षेप नोंदवण्यात आला की, वाटपाची मागणी केल्याशिवाय केवळ कायम मनाई आदेशाकरीता केलेला दावा चालण्यास पात्र नाही. त्यानुसार वादीने तो दावा पुरसीस दाखल करून वाटपाच्या मागणीसह नवीन दावा दाखल करण्याच्या अटीवर काढुन घेतला. यावरून असे दिसुन येते की, वादीने त्या दाव्यात वाटपाची मागणी केली नव्हती. जर वाटप झाले नव्हते तर वादीने त्याच दाव्यात वाटपाची मागणी केली असती. केवळ मनाई आदेशासाठी दावा दाखल करून वादीस यश मिळणार नाही, केवळ या कारणाकरीता वादीने सदरचा दावा वाटप व कायम मनाई आदेशासाठी दाखल केला आहे.

६७. वरील मुद्दा क्र.१ ते ५ च्या चर्चेनुसार वादी, प्रतिवादी क्र.१ व २ हे त्यांच्या झालेल्या वाटपाप्रमाणे त्यांच्या हिश्यास आलेल्या दावा मिळकती

उपभोगत आहेत. त्यांचे सर्व आर्थिक व्यवहार तसेच स्वयंपाक करून खाणे हे सर्व वेगळे आहे. यावरून वेगळे राहण्याचा त्यांचा हेतु स्पष्ट होतो. वडीलांनी त्यांच्यामध्ये वाटप करून दिले होते व त्यानुसार ते दावा मिळकती उपभोगत आहेत. म्हणुन वादीने केलेली विनंती मंजुर होण्यास पात्र नाही. त्यामुळे वादीचा दावा खर्चासह नामंजुर होण्यास पात्र आहे. त्यानुसार मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

१. दावा खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करणेत यावा.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.05.05 13:51:43 +0530

ठिकाण –गडहिंग्लज.
दिनांकः–०५/०५/२०२६.

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
गडहिंग्लज.